Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ५, अंक ३६ ] गुरूवार ते बुधवार, नोव्हेंबर १४-२०, २०१९/कार्तिक २३-२९, शके १९४१ [पृष्ठे २, किंमत : रुपये ८.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक-अ—अमरावती विभागीय पुरवणी

**(भाग चार - ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.**

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १४६.

**अध्यक्ष, नगर परिषद, यांजकडून**

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये अंजनगांव सुर्जी शहराच्या मंजूर(सु) विकास योजनेत किरकोळ फेरबदल करण्याबाबत.—**

क्रमांक बांध-२९८१-२०१९.—

अंजनगांव सुर्जी शहराची (सुधारित) विकास योजना मा. संचालक नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे आदेश पत्र वि.यो/अंजनगांव सुर्जी (सु)-टि.पी.व्ही.-६-७४२७, दि. १८-१२-१९९२ अन्वये मंजूर केली असून ती ०१-०३-१९९३ पासून अंमलात आलेली आहे. सुधारित विकास योजना अंतर्गत अंजनगांव सुर्जी मधील महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१) मधील तरतुदीस अधिन राहून अंजनगांव सुर्जी नगर परिषदेने दि. ७-११-२०१९ चे विशेष सभेतील ठराव क्र. ५५ नुसार खालीलप्रमाणे भागशः किरकोळ फेरबदल करण्याचे ठरविले आहे.

**फेरबदल.**—अंजनगाव सुर्जी शहराचे विकास योजनेप्रमाणे आरक्षण क्र. ३३ हे हायस्कुल करीता आरक्षित आहे. सदर आरक्षणाचा पश्चिमेकडील भाग हा अजून पावेतो कोणताही उपयोगात नसून खुला पडून आहे. पश्चिमेकडील उत्तर-दक्षिण भागात ६३२५ चौ. मी. जागा इनडोअर स्टेडीयम बांधकामाकरीता घेण्याचे ठरविले आहे. तसेच न. प. मार्फत विकास करावयाचे ठरविले आहे. तरी आरक्षण क्र. ३३ मधून ६३२५ चौ. मी. पश्चिमेकडील उत्तर-दक्षिण भागातील जागी इनडोअर स्टेडीयम म्हणून दर्शविण्यात आले.

वरील फेरबदल करीता अध्यक्ष, नगर परिषद, अंजनगांव सुर्जी यांनी तारीख घालून स्वाक्षरी केलेल्या प्रस्तावास भागशः फेरबदल दर्शविणारा नकाशा अहवालासह नगर परिषद कार्यालयात कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत जनतेच्या अवलोकनार्थ खुला ठेवण्यात आला आहे. त्यावरून महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) मधील तरतुदी अन्वये जाहीर करण्यात येते की, उक्त प्रस्तावित केलेल्या अंजनगांव सुर्जी शहराचे सुधारित विकास योजनेत भागशः किरकोळ फेरबदल बाबत काही सूचना अगर हरकती असतील तर त्यांनी हि सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध झालेल्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत नगर परिषद, अंजनगाव सुर्जी कार्यालयात लेखी स्वरूपात सादर कराव्यात म्हणजे उपरोक्त भागशः किरकोळ बदलाचे प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यापूर्वी प्राप्त सूचना आक्षेपाचा विचार करण्यात येईल.

**ॲड. कमलकांत भा. लाडोळे,**
अध्यक्ष,
नगर परिषद, अंजनगांव सुर्जी.

अंजनगांव सुर्जी :
दिनांक ८ नोव्हेंबर २०१९.

अ.-एक-अ-१ (१७००).

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १४७.

**BY PRESIDENT, MUNICIPAL COUNCIL**

**Minor modification in sanctioned Development Plan of Anjangaon Surji under Section 37(*1*) of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.**

No. 2981-Const.-2019.—

The (revised) Development Plan of Anjangaon Surji Town has been sanctioned by the Director of Town Planning, Maharashtra State, Pune Notification No. TPV-6/7427, dt. 18-12-1992 and came into force *w.e.f.* 01-03-1993.

The Municipal Council Anjangaon Surji *vide* its Special Meeting Resolution No. 55, dt. 7-11-2019 has decided to affect minor modification in the sanctioned (Revised) Development Plan of Anjangaon Surji Town binding with the provision of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966, Article 37(*1*) is as under.

*Modification.*—As per Town Development Plan of Anjangaon Surji Reservation No. 33 is already reserve for High School. The western side of the Mentioned reservation is open, it is till unused. So, it is decided to construct Indoor Stadium on its North-South part from western side about 6325 sq. metre and to develop it by Municipal Council. Hence, it is showed Indoor Stadium in modification Plan its 6325 sq. metre area in Reservation No. 33 of its North-South part from the western site.

The Plan showing the above proposed minor modification signed and dated by the President, Municipal Council, Anjangaon Surji is kept in the office of the Municipal Council, Anjangaon on working days during office hours for inspection by the public.

Now, in presence of the Section 37(*1*) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966, it is hereby notified that any person having any objections or suggestions in respect of the same minor modification to the said Development Plan may submit the same in written to the Municipal Council, Anjangaon Surji within a period of 30 days from the date of publication of this notification in Maharashtra Government Gazette. The objections and suggestions, if any, would be considered before sending the proposal to the Government for approval.

Adv. KAMALKANT B. LADOLE,

Anjangaon Surji :

President,

Dated the 8th November 2019.

Municipal Council, Anjangaon Surji.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE, PRINTED AT GOVERNMENT PRESS, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE.